मजकुर :—

दिनांक ०९/०५/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे फेब्रुवारी व मार्च —२०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी —२०२५

| | | |
|---|---|---|
| ०३ | गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष—६, मुंबई | शिवाजी नगर पोलीस ठाणे. गु.र.क्र. ८१/२०२५ कलम १३७ (२),१०३ भा.न्या.संहिता |

—: " आकस्मिक रागाने जिवे ठार मारण ":—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमूद नमुद गुन्हयात फिर्यादी यांची मुलगी हि त्यांच्या राहत्या घरातून खेळता — खेळता घराबाहेर गेली. परंतु बराच वेळ झाला तरी ती पुन्हा घरात आली नाही. तिचा सर्वत्र ोध घेवून देखील मिळून न आल्याने तिचे फिर्यादींच्या संमतीशिवाय त्यांच्या कायदेशीर रखवालीतून कोणीतरी अज्ञात इसमाने अपनयन केले म्हणून फिर्यादींच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.सदर गुन्हयात कलम १०३ भा.न्या.स. ची वाढ करण्यात आली

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती तजिम फातीमा इजाज खान |
| बळीत | :— | कु. आयशा निहाल खान, वय— २ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | विधी संर्घषग्रस्त बालक अली बाबू शेख, १० वर्षे ,<br>अटक दिनांक — ०८/०२/२०२५ |

तपास कौशल्य :— नमूद गुन्हयातील अल्पवयीन बालिकेचे वय २ वर्षे, १० महिने असल्याने, नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून अल्पवयीन बालिकेचा शोध घेण्याच्या अनुषंगाने कक्ष ६, कार्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एकूण ५ पोलीस पथके तयार करण्यात आले.

नमुद पोलीस पथकांकडून प्रथम अपहृत मुलीचे फोटो डेव्हलप करून शिवाजीनगर, गोवंडी, परिसरातील नागरीकांना दाखविण्यात आले. त्यानंतर अल्पवयीन मुलगी मिळून येण्याच्या अनुषंगाने सदरचे फोटो विविध व्हॉटस्‌अॅप ग्रुप वरती पाठविण्यात आले.

सदर पोलीस पथकांनी नमुद अल्पवयीन मुलगी मिळून येण्याच्या अनुषंगाने शिवाजी नगर पोलीस ठाणे हददीमधील असे एकुण ४०ते ५० खाजगी व शासकीय सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजची तपासणी केली. त्यामध्ये अपहृत बालिका ही ०६/०२/२०२५ रोजी १३:०६ वा. शिवसेना शाखा क्रं. १३४, रफिकनगर, ९० फुट रोड, रूम नं. ०९, लाईन बी, रोड नं. ०२ च्या जवळ, शिवाजीनगर येथील शाखेचे सी.सी.टी.व्ही. फुटेजची तपासणी करतांना अपहृत बालिकेस साधारणत: ०९ ते १० वर्षे, वयाचा त्याने नेसणीस लाल रंगाचा शर्ट व हाफ पॅन्ट परिधान केलेला मुलगा तिच्या हाताला धरून सांडपाण्याच्या नाल्याला लागून असलेल्या रोडने सोबत घेवून जाताना दिसून आला.

सदर सीसीटीव्ही फुटेजचा कौश्यल्यपुर्ण तपास केला असता, वरील नमुद वर्णनाचे मुलगा अपहृत बालिकेस सदरील सांडपाण्याच्या नाल्याच्या भिंतीस लागून असलेल्या रोडवर पार्क केलेल्या दोन टेम्पोंच्या मधील जागेत घेवून जातांना दिसला.तेव्हा नमुद मुलाने अपहृत बालिकेस उचलून नाल्याच्या भिंतीवर बसविले. त्यानंतर त्याने आजूबाजूस पाहून कोणी नसल्याची खात्री करून तिला नाल्यात ढकलून दिले व तेथून पळून गेला.

त्यानंतर नमुद पोलीस पथके लागलीच अपहृत बालिकेस सांडपाण्याच्या नाल्यात ढकलून देणाऱ्या अनोळखी मुलाचा शोध घेण्याकरीता शिवाजीनगर परिसरात रवाना झाले. नमुद पथकांनी सदर मुलाचा सी.सी.टी.व्ही. फुटेज वरून फोटो डेव्हलप केला. त्यानंतर सदर फोटो शिवाजीनगर परिसरातील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरीक, दुकानदार, गॅरेजवाले, हॉटेलवाले व लहान मुलांना दाखवून त्याचे बाबत विचारपूस सुरू केली. पोलीस पथकांनी सतत ४५ तास शोध घेतल्यानंतर शिवाजी नगर परिसरात राहणाऱ्या एका लहान मुलाने अपहृत बालिकेस ढकलून देणाऱ्या मुलास ओळखत असल्याचे सांगून त्याचे घर माहीत असल्याचे सांगितले. त्यावरून बाजूस नमुद पोलीस पथकातील अधिकारी, महिला अंमलदार यांनी मुलास सोबत घेवून अपहृत बालिकेस ढकलून देणाऱ्या मुलाचे घर माहीती करून घेतले व त्यास पुन्हा त्याचे घरी जावून पालकांच्या ताब्यात दिले.

त्यानंतर लहान मुलाने दाखविलेल्या घरात राहावयास असलेल्या महिलेस, महिला पोलीस अंमलदाराच्या साहयाने संशयीत मुलाचा फोटो दाखविला असता, नमुद महिलेने तो तिचा भाचा असल्याचे सांगुन त्याचे नाव अली बाबू शेख वय– १० वर्षे, असल्याचे सांगितले. त्यावेळी तो कुठे आहे, याबाबत विचारणा केली असता, तिने तो कचरा वेचण्यासाठी गेला असल्याचे सांगितले. तेव्हा त्याच्या राहत्या घराच्या आजूबाजूला पोलीस पथक ठेवून त्याचेवर पाळत ठेवण्यात आली. काही वेळेच्या प्रतिक्षेनंतर नमुद मुलगा हा घरी आला. त्यावेळी त्याच्याकडे महिला पोलीस अंमलदारांच्या मदतीने कौशल्यपुर्ण विचारपूस केली असता, त्याने दोन दिवसांपूर्वी एका छोटया मुलीस हात धरून घेवून जात असतांना, तिने त्याचे केस ओढून लाथ मारल्याचा राग आल्याने त्याने अपहृत बालिकेस सांडपाण्याच्या नाल्यामध्ये ढकलून दिल्याचे सांगितले व सदर सांडपाण्याचा नाला गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास दाखलि.

त्यावरून पोलीस पथकाने सदर घटनास्थळी अग्निशमन दलास पाचारण करून अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने नाल्यामध्ये अपहृत बालिकेचा शोध घेतला असता, ती नाल्यामध्ये मयत मिळून आली. त्यानंतर सदर बालिकेस शिवाजीनगर मोबाईल– १ मधुन राजावाडी रूग्णालय येथे पाठविण्यात आले. दि. ०९/०२/२०२५ रोजी मयत बालिकेचे शेवविच्छेदन करण्यात आले असून, त्यामध्ये प्राथमिक कारण Axphyxia due to Drowning however vicera preserved for chemical analysis असे देण्यात आले आहे. त्यानंतर नमुद गुन्हयात भा.न्या.सं. कलम १०३ ची वाढ करण्यात आली आहे.

अशा प्रकारे गुन्हे शाखा, कक्ष ६, चेंबूर, मुंबई च्या नमुद पोलीस पथकांतील अधिकारी अंमलदार यांनी सतत ४८ तास अथक परिश्रम घेवून अपहृत बालिके संदर्भातील संवेदनशील गुन्हा उघडकीस आणला आहे.

**गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष–६, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस आयुक्त(डी पुर्व) | श्री.चंद्रकांत जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. भरत दिनकर घोणे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | श्री. सुशांत गणपत सावंत, (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. नागेश प्रकाश चिकणे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | श्री.नंदकुमार विष्णू बेळणेकर (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ६ | श्रेणी पोलीस उप निरीक्षक | श्री. नितीन बंडू सावंत (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ७ | श्रेणी पोलीस उप निरीक्षक | श्री. विनय वसंत सकपाळ, (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ८ | स.पो.उ.नि. क्र. ३१९५६ | निलेश दत्ताराम पारकर (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र.९७०५४२ | विजय बबन भिलारे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. ९७१०६१ | संतोष रघुनाथ चव्हाण (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ९८०६९७ | नितिन नामदेव तुपे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्रं. ०१.०२८८ | सचिन दशरथ जेडगुले (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र.०३०९९५ | नागनाथ देसू जाधव (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.०३.१००८ | अंकुश वामनराव वानखेडे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र ०४०१४८ | रविंद्र लाला शिरसाट (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्रं. ०४.०३६३ | विद्यानंद गोरखनाथ शिंदे, (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र.०४. ११३२ | विनोद प्रकाश गायकवाड (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. ०६.१७०३ | सुरेश ज्ञानू घेरडे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०७.०४०० | संजय भास्कर भालेराव (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र.०७.०७७४ | दिगंबर आनंदराव माळवेकर (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | पो.शि.क्र.०६–१८३६ | अंकुश तुकाराम पांचाळ (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्रं. ०८.०२९६ | संभाजी विठ्ठल कोळेकर (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र. ०८०३३० | अमजद अजिज शेख (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र. ०८.०३३९ | अमोल वसंत इंगळे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र. ०८०९५२ | श्री. सचिन वसंत पाटसुपे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. ०९.०३१९७ | कृष्णा कनिराम पवार (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २७ | म.पो.शि. ०८.१४२६ | संगीता तुळशिराम अभंग (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २८ | म.पो.शि.०९.२०५५ | शोभा संतोष सरोदे (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| २९ | म.पो.शि.१४.०९८८ | भाग्यश्री रूपेश सुतार (कक्ष–६) | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.ह.चा.क्र.९८०७६५ | वसंत कृष्णा डाळे | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ह.चा.क्र.००.६७४ | गणेश महादेव कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ह.चा.क्र.३१५२४ | गोकुळ साहेबराव जायभाय | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.शि.चा.क्र. १७.१३६५ | युवराज भास्कर पाटील | प्रशस्तीपत्रक |